


**Dr. Mrudula Belle on IPR**

## देशमुख महाविद्यालयात वाणिज्य सप्ताह

नाशिक रोड, ता. २८ : पेटंट, ट्रेड मार्क, कॉपीराइट आदींचा समावेश असलेल्या बौद्धिक संपदा कायद्यात मुक्त व्यावसायिक म्हणून मोठी संधी आहे, असे प्रतिपादन डॉ. मृदुला बेळे यांनी केले. नाशिक रोड येथील बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात वाणिज्य सप्ताहाचे उद्‌घाटन झाले. त्या वेळी त्या पहिल्या सत्रात बोलत होत्या. गीता जोशी, प्रा. डॉ. सुषमा हसबनीस, प्रा. डॉ. करुणा कुशारे, प्रा. भास्कर नरवटे, प्रा. राधिका काळे, प्रा. संदीप गाडेकर, प्रा. सारिका निकाळे आदी उपस्थित होते. डॉ. बेळे म्हणाल्या, की पेटंटसाठी सृजनशीलता, नावीन्य या गोष्टी आवश्यक आहेत. त्यांनी बौद्धिक संपदा कायद्यातील पेटंट, ट्रेड मार्क, कॉपीराइट आदींची माहिती दिली. या तिन्हींची नोंदणी कशी करावी, पेटंट व ट्रेड मार्कधारकाला काय अधिकार आहेत, हे सांगतानाच पेटंटची नोंदणी कशी करावी, याची माहिती दिली. दुसऱ्या सत्रात गीता जोशी यांनी वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्रातील करिअरची संधी याची माहिती दिली. सीए, आयसीडब्ल्यूए, एमबीए, एमपीएम, एमएसडब्ल्यू, सीएस, पीएच.डी., तसेच एक वर्षाच्या व्यावसायिक शिक्षणक्रमाची माहिती दिली. तिसऱ्या सत्रात 'श्रावण क्वीन'ची स्पर्धक व विद्यार्थिनी प्रियंका घुमरे हिने स्पर्धेतील अनुभव सांगितले. दीक्षा जाधवने सेट परीक्षेबाबत टिप्स दिल्या. या विद्यार्थिनींचा सत्कार प्राचार्य लिंबारे यांच्या हस्ते झाला. जीएसटी, डिजिटल इंडिया, स्मार्टसिटीवर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा झाली.

उपनगरला सोनसाखळी

दै. सकाळ. २९/८/२०१७

★ महाराष्ट्र टाइम्स ★ नाशिक ★ ३० ऑगस्ट २०१७

# 'बौद्धिक संपदा कायद्याने व्यावसायिकांना संधी'

**म. टा. वृत्तसेवा**, नाशिकरोड

पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट आदींचा समावेश असलेल्या बौद्धिक संपदा कायद्यात मुक्त व्यावसायिक म्हणून मोठ्या संधी असल्याचे प्रतिपादन डॉ. मृदुला बेळे यांनी केले.

नाशिकरोड येथील बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात वाणिज्य सप्ताहाचे उद्घाटन झाले. त्यावेळी पहिल्या सत्रात त्या बोलत होत्या. गीता जोशी, प्रा. डॉ. सुषमा हसबनीस, प्रा. डॉ. करुणा कुशारे, प्रा. भास्कर नरवटे, प्रा. राधिका काळे, प्रा. संदीप गाडेकर, प्रा. सारिका निकाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बेळे म्हणाल्या की, पेटंटसाठी सृजनशीलता, नाविन्य या गोष्टी आवश्यक आहेत. त्यांनी बौद्धिक संपदा कायद्यातील पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट आदींची माहिती दिली. या तिन्हींची नोंदणी कशी करावी, पेटंट व ट्रेडमार्कधारकास काय अधिकार आहेत, हे सांगताना पेटंटची नोंदणी कशी करावी, याची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात गीता जोशी यांनी वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्रातील करिअरची संधी याची माहिती दिली. सीए, आयसीडब्लूए, एमबीए, एमपीएम, एमएसडब्लू, सीएस, पीएचडी तसेच एक वर्षाच्या व्यावसायिक शिक्षणक्रमांची माहिती त्यांनी दिली. तिसऱ्या सत्रात 'श्रावण क्वीन'ची स्पर्धक व विद्यार्थिनी प्रियंका घुमरेने स्पर्धेतील अनुभव सांगितले, तर दीक्षा जाधवने सेट परीक्षेबाबत टीप्स दिल्या.

या विद्यार्थिनींचा सत्कार प्राचार्य लिंबारे यांच्या हस्ते झाला. जीएसटी, डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटीवर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा झाली.

प्रशांत धिवंदे

२०१६-१७

# महिला महाविद्यालयात वाणिज्य सप्ताह

**नाशिक । दि.११ प्रतिनिधी**

नाशिकरोड येथील कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात नुकताच वाणिज्य सप्ताह पार पडला. सप्ताहाचे उद्घाटन बँक ऑफ महाराष्ट्रचे वरिष्ठ प्रबंधक बी. एम. गिरासे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुषमा हंसबनीस होत्या.

बँकिंग क्षेत्राचा उदय, बँकांवर नियंत्रण ठेवणाऱ्या रिझर्व बँकेची कार्यपद्धती, बँकिंगमधील करिअर संधी, आयबीपीएस संस्थेमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेचे स्वरुप, परीक्षेची करावयाची तयारी, आदींबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी यशस्वी महिला उद्योजकांच्या मुलाखतींचा कार्यक्रम झाला. जयश्री थोरात, चारुशीला गडाख, कांचन जगताप यांनी आपापल्या उद्योग-व्यवसायातील वाटचालींची माहिती दिली. कष्टाची तयारी, चिकाटी, अडचणींवर मात करण्याची जिद्द असेल तर जीवनात नक्कीच यशस्वी होता येते. व्यवसायात उद्योजकाला जोखीम पत्करावी लागते. संयम ठेऊन वाटचाल केली तर यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. तिसरे पुष्प प्रवचनकार कांचन जगताप यांनी गुंफले. विद्यार्थी दशेत ध्येय निश्चिती करून अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतीय संस्कृतीत आई, वडील, शिक्षक गुरूस्थानी आहेत. त्यांच्याकडे आदराने पाहिले पाहिजे, असे जगताप म्हणाल्या.

चौथे पुष्प-चार्टर्ड अकौंटंट हर्षल सुराणा व अतुल मांडोरे यांनी गुंफले. चार्टर्ड अकौंटंट क्षेत्रातील करिअर संधी, कंपनी सेक्रेटरी, आयसीडब्ल्यूए, एमबीए आदी परीक्षांचे स्वरुप याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. अनेक देशात कॉम्प्युटराईजड अकौंटिंग टॅली क्षेत्रात मोठ्या संधी असल्याचे सुराणा यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. डॉ. करुणा कुशारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. राधिका काळे यांनी करून दिला. प्रा. सारिका निकाळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भास्कर नरवटे यांनी केले.

Vaishnavi Pramod Pagare F.Y.B.com